1S8

# HH1

D.El.Ed. Examination
JANUARY, 2021
Second Year (2016 Revised Syllabus)
SOCIAL STUDY PEDAGOGY
(Marathi Medium)
Time : 11.00 to 1.00 Hrs.

Date : 29/01/2021 (4 Pages) Max. Marks : 40

सूचना :— (1) या प्रश्नपत्रिकेत इतिहास अध्ययन-अध्यापनशास्त्र (भाग-1 प्रश्न क्र. 1 ते 4) व भूगोल अध्ययन-अध्यापनशास्त्र (भाग-2 प्रश्न क्र. 5 ते 8) असे दोन भाग आहेत.

(2) उत्तरपत्रिकेत कोणताही एक भाग पूर्ण लिहिल्यानंतरच दुसरा भाग सोडवावा.

## भाग-1

### इतिहास अध्ययन-अध्यापनशास्त्र (20 गुण)

1. **(अ) गट 'अ' व गट 'ब' मधील योग्य पर्यायांच्या जोड्या लावा : 2**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (1) धुरंधर | (*a*) स्थलदर्शक संबोध |
| (2) तेरेखोल | (*b*) कालदर्शक संबोध |
| | (*c*) गुणधर्मविशिष्ट संबोध |

**(ब) रिकाम्या जागी योग्य शब्द घालून विधान पुन्हा लिहा : 2**

(1) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण .................................... नुसार अभ्यासक्रमात गाभाभूत घटकांचा समावेश केला आहे.

(2) इयत्ता 6वी ते 8वी या स्तरास .................................... स्तर असे म्हणतात.

2. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी 60 ते 80 शब्दांत लिहा : 6

(1) प्राथमिक स्तरावर इतिहासाचे अध्यापन प्रभावी होण्यासाठी कथन पद्धतीचा वापर कसा कराल ?

(2) इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांना इतिहास विषयासाठी प्रकल्प सुचवा.

(3) विद्यार्थ्यांचा इतिहासाच्या उपक्रमांमधील सहभाग नोंदविण्यासाठी पदनिश्चयन श्रेणी तयार करा.

3. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी 120 ते 160 शब्दांत लिहा : 6

(1) इयत्ता 6वीच्या इतिहासाच्या पाठ्यपुस्तकाचे परीक्षण कोणकोणत्या निकषांच्या आधारे कराल ?

किंवा

इयत्ता 6वीची इतिहास अध्यापनाची उद्दिष्टे 6वीच्या इतिहासाच्या पाठ्यपुस्तकातून साध्य होतात का ? सोदाहरण लिहा.

(2) इतिहास व नागरिकशास्त्राच्या मूल्यमापनासाठी उपयुक्त ठरतील अशी कोणतीही तीन गुणात्मक साधने सोदाहरण लिहा.

किंवा

उपचारात्मक अध्यापन ही संकल्पना स्पष्ट करा.

4. पुढील प्रश्नाचे उत्तर 200 ते 250 शब्दांत लिहा : 4

क्षेत्रभेट म्हणजे काय ? इतिहास अध्यापनात क्षेत्रभेटींचे आयोजन कसे कराल ?

किंवा

नियोजन म्हणजे काय ? इयत्ता 6वी ते 8वीच्या इतिहास विषयाच्या कोणत्याही एका घटकाचे घटक नियोजन तयार करा.

## भूगोल अध्ययन-अध्यापनशास्त्र

(20 गुण)

5. (अ) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहून विधान पूर्ण करा : 2

(1) नकाशा हा भूगोलाचा .............................. आहे.

(2) भूक्षेत्र मर्यादा निश्चित करून देशाचा राजकीय क्षेत्राचा अभ्यास .............................. अध्यापन पद्धतीत केला जातो.

(ब) योग्य पर्यायांच्या जोड्या जुळवा : 2

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (1) संख्यात्मक मूल्यमापन | (*a*) पदनिश्चयन श्रेणी |
| (2) आकारिक मूल्यमापन | (*b*) लेखी परीक्षा |
| | (*c*) व्यक्तिमत्त्व आकार घेत असताना केले जाते. |

6. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी *60* ते *80* शब्दांत लिहा : 6

(1) पृथ्वी गोल व नकाशा यातील फरक स्पष्ट करा.

(2) पाठ नियोजनाची आवश्यकता लिहा.

(3) वार्षिक नियोजनाचा आराखडा तयार करा.

7. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी *120* ते *160* शब्दांत लिहा : 6

(1) ज्ञानरचनावादी वर्गातील आंतरक्रियेचे स्वरूप स्पष्ट करा.

**किंवा**

नकाशावाचनाच्या पायऱ्या स्पष्ट करा.

(2) इयत्ता 6वी साठी उपयोजन उद्दिष्टावर आधारित तीन लघूत्तरी प्रश्न तयार करा.

**किंवा**

भूगोल शिक्षकाच्या अंगी कोणकोणती गुणवैशिष्ट्ये असावीत असे तुम्हाला वाटते ?

8. **खालील प्रश्नाचे उत्तर *200* ते *250* शब्दांत लिहा :** **4**

इयत्ता 6वी ते 8वी मधील कोणत्याही एका इयत्तेच्या भूगोल पाठ्यपुस्तकाचे परीक्षण करा.

**किंवा**

संबोध म्हणजे काय ? वातावरण, महासागर व रेखांश हे संबोध शिक्षक म्हणून तुम्ही वर्गअध्यापनात कसे स्पष्ट कराल ?